# आता खवल्या मांजरांना मिळणार 'सुरक्षा कवच' - अभ्यासगटाची स्थापना

**वृत्तसंस्था/ ३१ डिसेंबर**

**मुंबई :** राज्यातील खवल्या मांजरांना आता सुरक्षा कवच मिळणर असून या मांजरांच्या संरक्षण आणि संवर्धनाच्या उपाययोजना सुचवण्यासाठी पुण्याचे वनसंरक्षक (वन्यजीव) रमेशकुमार यांच्या अध्यक्षतेखाली वन विभागाने अभ्यासगट स्थापन केला आहे. हा अभ्यासगट खवले मांजर प्रजातीच्या संरक्षण आणि संवर्धनासाठी आवश्यक असलेला कृती आराखडा तयार करून राज्य शासनास सादर करील.

राज्य वन्यजीव मंडळाच्या १५ व्या बैठकीत वन्यजीव मंडळाच्या सदस्यांनी या प्रजातीच्या संरक्षण आणि संवर्धनासाठी उपाययोजना करण्याची आवश्यकता असल्याचे मत व्यक्त केले होते. त्यांच्या या मताची मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी दखल घेत यासंबंधीच्या उपाययोजना सुचविण्यासाठी अभ्यासगट स्थापन करण्याचे निर्देश दिले होते.

या अभ्यासगटात वन्यजीव व्यवस्थापन, संशोधन आणि वन्यजीव गुन्हे क्षेत्रातील तज्ज्ञांचा समावेश करण्यात आला आहे. अभ्यासगटात दीपक खाडे- उपवनसंरक्षक- चिपळुण-रत्नागिरी, विश्वास काटदरे (भाऊ)-सदस्य राज्य वन्यजीव मंडळ, डॉ. वरद बी गिरी- संस्थापक संचालक एनआयडीयुएस, नितीन देसाई संचालक सेंट्रल इंडिया वाईल्ड लाईफ प्रोटेक्शन सोसायटी ऑफ इंडिया, रोहन भाटे माजी मानद वन्यजीव रक्षक सातारा यांचा सदस्य म्हणून समावेश करण्यात आला आहे तर सातारा येथील उपवनसंरक्षक डॉ.बी.एस हाडा हे या अभ्यासगटाचे सदस्य सचिव असतील. खवले मांजर ही महत्वाची प्रजाती असून ती वन्यजीव संरक्षण अधिनियम १९७२ अंतर्गत अनुसूची १ मध्ये समाविष्ट आहे. विविध



कारणांमुळे या प्रजातीच्या अधिवासास धोका निर्माण होत आहे. खवल्यांसाठी या मांजरीची शिकार करण्याचे प्रकार होऊन त्यामध्ये संघटित गुन्हेगारीच्या घटनाही उघडकीस आल्या आहेत. त्यामुळे त्यांच्या संरक्षण आणि संवर्धनासाठी उपाययोजना करण्याची आवश्यकता राज्य वन्यजीव मंडळाच्या बैठकीत व्यक्त करण्यात आली होती. आता हा अभ्यासगट खवल्या मांजरीचे अधिवास व्यवस्थापन, गुन्हेगारीवर आळा घालणे, गुप्त माहिती मिळवणे, जनजागृती कराणे यासारख्या बार्बीचा विचार करून त्यांच्या संरक्षण आणि संवर्धनाचा कृती आराखडा तयार करील. खवले मांजर प्रजातीचा अधिवास, त्यांचे अस्तित्त्व, त्यांना असलेल्या धोक्यांचा अभ्यास करणे, खवले मांजरीच्या अवैध व्यापाराच्या व्याप्तीचा अभ्यास करणे, अवैध व्यापारावर आळा घालणे, त्यांच्या संरक्षण आणि संवर्धनासाठी उपाययोजना सुचवणे ही या तांत्रिक अभ्यासगटाची कार्यकक्षा असेल.

**ओळख खवल्या मांजरीची...**

अफ्रिकेत चार आणि आशिया खंडात चार अशा जगभरात खवल्या मांजरीच्या आठ प्रजाती आढळतात. यापैकी भारतात दोन प्रजाती आढळतात. उत्तर भारतात चिनी खवले मांजर आढळते तर उर्वरित भागात भारतीय खवले मांजर आढळते. इंटरनॅशनल युनियन फॉर कंझरव्हेशन ऑफ नेचर ही आंतरराष्ट्रीय संस्था १९४८ पासून जगभरातील संकटग्रस्त प्रजातींचा अभ्यास व संवर्धनासाठी काम करते. त्यांच्या रेडबूकमध्ये भारतीय खवले मांजर धोक्यात असलेली प्रजाती म्हणून नोंदवली गेली असून तिच्या संरक्षण आणि संवर्धनासाठी प्रयत्न सुरु आहेत. ८ ते २० किलो वजनाच्या या मांजरीच्या शरीरावर केरोटीन नावाच्या प्रथिनांनीयुक्त असलेल्या खवल्यांचे आवरण असते. डोके, पाठ, अंगाच्या दोन्ही बाजू, पाय आणि शेपटी मोठ्या खवल्यांनी झाकलेले असतात. शरीराच्या खालच्या बाजूवर खवले नसतात, पण जाड ताठ केस असतात. हा निशाचर प्राणी आहे. दिवसा ही मांजर खोल बिळात झोपलेली असते. शरीराचे वेटोळे करून ती झोपते. पुढच्या पायाच्या नखांनी खोल बिळ उकरून ती मुंग्या आणि वाळवी जिभेने चाटून खाते. पाणीही जिभेने चाटूनच पिते. हळुहळु जमीनीचा वास घेत चालणे, आजूबाजूला नीट पहाता यावे म्हणून मागच्या पायावर उभे राहून पाहणे, जसे या मांजरीला जमते. तसेच ती झाडावरही चढू शकते.

संकटाच्या वेळी पोटात डोके खुपसून, शरीर वाकवून त्याचा खालचा भाग शेपटीने झाकून त्या अंगाची चेंडूसारखी घट्ट गुंडाळी करतात. मादी हिंडत असतांना पिलू तिच्या शेपटीवर चिकटून बसते, संकटाच्यावेळी मादी पिल्लाला पोटाखाली झाकून अंगाची गुंडाळी करते.

**खवले मांजरांच्या संरक्षण संवर्धनासाठी देशात महाराष्ट्राचा पुढाकार- भाऊ काटदरे**

सर्व प्रकारच्या अधिवासात जुळवून घेण्याच्या क्षमतेमुळे संपूर्ण महाराष्ट्रात कमी अधिक प्रमाणात खवल्या मांजराचे अस्तित्व आहे. मुंग्या आणि वाळवी हे खाद्य असलेली ही मांजर निशाचर असून मानवास तिच्यापासून काहीही धोका नाही. पण माणसाकडून मात्र तिच्या अस्तित्वाला आणि अधिवासाला धोके पोहोचवण्याचे काम काही ठिकाणी सुरु आहे. खवल्यांसाठी खवल्या मांजरांची शिकार केले जाण्याचे प्रकार व यामध्ये संघटित गुन्हेगारीच्या घटना घडल्याचेही दिसून आले आहे. याविषयी राज्य वन्यजीव मंडळाच्या १५ व्या बैठकीत खवले मांजरीच्या संरक्षण आणि संवर्धनाचा कृती आराखडा तयार करण्याचा प्रस्ताव आपण मांडला होता.

त्यावर शासनाने हा अभ्यासगट स्थापन केला आहे. खवल्या मांजरांची शिकार आणि चोरटा व्यापार थांबवण्यासाठी हे पाऊल अत्यावश्यक होते. महाराष्ट्राने भारतात प्रथमच खवलेमांजर संरक्षण आणि संवर्धन कृती आराखडा तयार करण्यासाठी तज्ज्ञ गटाची नियुक्ती केली आहे. ही अतिशय आनंदाची बाब आहे. यातून खवले मांजराचे संरक्षण आणि संवर्धन होईल याची खात्र वाटते असे राज्य वन्यजीव मंडळाचे सदस्य विश्वास (भाऊ) काटदरे यांनी सांगितले. सह्याद्री निसर्ग मित्र, चिपळूण. सदस्य राज्य वन्यजीव मंडळ. सदस्य आययुसीएन

# शेतकरी त्रस्त स्थानिक प्रशासन मात्र सुस्थ

## गांगापुर येथील पांदण रस्ताकडे प्रशासनाचे दुर्दशा



**साहसिक वृत्त/ ३१ डिसेंबर**

**हिंगणघाट :** हिंगणघाट तालुक्यातील गांगापुर येथील पांदण रस्ता हा वडणेर येथील हायवे ७ ला जोडला गेला, गांगापुर येथील शेतकऱ्यांना व मजुरांना शेता मध्ये जाण्यासाठी हा रस्ता चिखलाने माखलेला दिसून येत आहे , शेतकऱ्यांचे स्वप्न पूर्ण कधी होणार. मागील १८ वर्षांपासून शेतकऱ्यांना व शेतमजुरांना पांदण रस्ताचा त्रास भोगावा लागतो , शेतामधून घरी कापूस, तूर सोयाबीन , गहू ,हरभरा ,व सलपेट , खत ,इत्यादी बैलबंडीने , ट्रॅक्टर, ने नेता येत नाही , तिथे फसून राहते, गावालाच लागून असलेले रस्ताची दुर्दशा असल्यामुळे ,वर्षानूवर्ष हा पांदण रस्ता चिखलाने माखलेला राहत असल्यामुळे शेतकऱ्यांना खूप त्रास सहन करावा लागतो , रस्ताच्या बाजूला नाली नसल्यामुळे गावातील व शेतातील सार्वजनिक पाणी ,त्या पांदण रस्त्यावर साचून राहते.पांदण रस्ताच्या मध्यभागी मोठा खोल खड्या सुद्धा असल्याने पाणी साचून राहते ,व मोठया खड्यामुळे शेतकऱ्यांच्या बैलाचे नुकसान सुद्धा झाले आहेत, त्यामुळे रस्ताची तत्काळ दुरुस्ती करण्यात यावी अशीमागणी प्रतिनिधी व परिसरातिल नागरिक करीत आहे. त्या मुळे प्रशासनाने लक्ष देऊन रस्ताचे काम पूर्ण करावे अशी मागणी विलास राऊत ,विट्ठल भोयर, विट्ठल पोहनकर पोहनकर भानुदास भोयर सूरज भोयर , देविदास भोयर ,बनडुजी, भोयर ,अमोल राऊत, अशोक पोहनकर, सचिन महाजन यांनी केली आहे.

# संजय गांधी निराधार योजनेच्या लाभार्थ्यांनी ३१ मार्च पर्यत जीवनप्रमाण प्रमाणपत्र सादर करावे

**साहसिक वृत्त/ ३१ डिसेंबर**

**वर्धा**: सेलू तालुक्यातील संजय गांधी निराधार योजने अंतर्गत विविध योजनेचा लाभ प्राप्त करणाऱ्या लाभार्थ्यांना दरवर्षी १ जानेवारी ते ३१ मार्च या कालावधित ज्या बँकेत खाते आहे त्या बँकेत जीवनप्रमाण प्रमाणपत्र सादर करावे लागतात. यासाठी लाभार्थ्यांनी ३१ मार्च पर्यंत संबधित बँकेत जीवनप्रमाण प्रमाणपत्रासह आधार कार्ड, बँकेच्या पासबुकची छायांकित प्रत व अपंग असल्यास अपंगत्वाचा दाखला सादर करावा. असे आवाहन सेलूचे नायब तहसिलदार के.पी. शेंडे यांनी केले आहे.

संजय गांधी निराधार योजने अंतर्गत संजय गांधी निराधार अनुदान योजना, श्रावणबाळ राज्य सेवा योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्ती वेतन , अंपग निवृत्ती वेतन व विधवा निवृत्ती वेतन योजनच्या लाभार्थ्यांनी जीवनप्रमाण प्रमाणपत्र प्राप्त करण्याकरीता बँक व्यवस्थापक किंवा पोष्ट मास्तर कडे स्वत: हजर राहून हयात प्रमाणपत्र ऑनलाईन पध्दतीने तयार करुन घ्यावे. असे तहसिल कार्यालय सेलू यांनी कळविले आहे.

## पान १ वरुन...

### देशाच्या इतिहासात पहिल्यांदाच बलात्काराची खोटी तक्रार देणाऱ्या महिलेविरुद्ध जन्मठेपेची शिक्षा असलेल्या गुन्ह्या अंतर्गत न्यायालयाकडून कारवाई

आहे. सदर प्रकरणात याचिकाकर्त्यांतर्फे अ‍ॅड. निलेश ओझा यांच्या सोबत अ‍ॅड. सदाशिव सानप, अ‍ॅड. ईश्वरलाल अगरवाल, अ‍ॅड. गोपाळ कहाळे, अ‍ॅड. प्रवीण चवरे, अ‍ॅड. विजय पमनानी, अ‍ॅड. दिपाली ओझा, अ‍ॅड. प्रतिक जैन सकलेचा, अ‍ॅड. शिवम मेहरा, अ‍ॅड. मंगेश डोंगरे, अ‍ॅड. दीपिका जैस्वाल, अ‍ॅड. पूनम राजभर, अँड. अभिषेक मिश्रा, स्नेहल सुर्वे, अ‍ॅड. सिद्धी धामणस्कर आदी वकील काम पाहत आहेत.

इंडियन बार असोसिएशनचे राष्ट्रीय अध्यक्ष अँड. निलेश ओझा यांनी 'How to take action against false affidavits & false cases (Law of Perjury)' या विषयावर सन २०१७ मध्ये पुस्तक प्रकाशीत केले आहे. **'कोण खरे आहे हे पाहण्यापेक्षा सत्य काय आहे'** या तत्वावर प्रकरणाचा तपास व न्यायालयातील केस चालविण्यासाठी त्यांचा अनेक वर्षांपासून लढा सुरु आहे. त्यांच्या लिखीत पुस्तकांच्या प्रती इंडियन बार असोसिएशन,मानव अधिकार सुरक्षा परिषद,ऑल इंडिया एस.सी., एस. टी. ॲन्ड मायनॉरीटी लॉयर्स असोसिएशन तर्फे देशातील विविध न्यायालयातील न्यायाधीश, वकिल संघ, बार कौन्सिल आदींना वितरीत करण्यात आल्या असून **'मानवतावादी वैश्विक भारत निर्माण अभियान'** या मिशनसाठी त्यांचे समर्थक, संघटनेचे पदाधिकारी व स्वयंसेवक अनेक वर्षांपासून अविरत कार्य करीत आहेत. अशी माहिती मानवाधिकार सुरक्षा परिषदेचे राष्ट्रीय सचिव रशिदखान पठान आधि आणि ऑल इंडिया एस.सी., एस. टी. ॲन्ड मायनॉरीटी लॉयर्स असोसिएशन चेअअमन अ‍ॅड. विवेक रामटेके यांनी दिली.

त्या जन जागरण अभियानाचे परिणाम मागील काही काळापासून दिसत असून सामान्य जनता, वकिल व न्यायाधीशांमध्ये सुद्धा फौ.प्र. संहिताचे कलम ३४० अंतर्गत कारवाईसाठी योग्य ते पोषक वातावरण निर्माण झाल्याचे चित्र आहे.

नुकतेच सर्वोच्च न्यायालयाने Rajnis Vs. Neha 2020 SCC OnLine SC 903 प्रकरणात कौटुंबिक न्यायालय व पती पत्नीमधील एकमेकांविरुद्धच्या आरोप प्रत्यारोपांमध्ये शपथपत्रावर खोटी माहिती दिल्यास दोषींवर ३४० कलमांअंतर्गत कारवाई करण्याचे निर्देश देशातील सर्व न्यायालयांना दिले आहेत.

सर्वोच्च न्यायालयाने वेळोवेळी कायदा बनवून दिला आहे की, जर न्यायालयाकडून चुकीचे आदेश घेण्याकरिता खोटी तक्रार किंवा खोटा पुरावा दिल्याचे किंवा असल्याचे सिद्ध होत ासेल तर अश्या व्यक्तीविरुद्ध ३४० फौ.प्र.सं.चे कलम व कोर्ट अवमाननाची कारवाई करायलाच हवी अन्यथा संबंधित न्यायाधिशाने आपल्या कर्तव्यात कसूर केला असे समजण्यात येईल. अश्या प्रकरणात आरोपीविरुद्ध कारवाई करण्यात टाळाटाळ करणारा न्यायाधीश हा भा.दं.वि २१८, २०१, १६६, २१९ आदी कलमाअंतर्गत शिक्षेस पात्र असतो अशी कायद्यात तरतूद असून त्याबाबत विभिन्न न्यायनिवाडे सर्वोच्च व उच्च न्यायालयाने ठरवून दिले आहेत.

खोटे आरोप करणाऱ्या महिलेविरुद्ध कारवाई न करता बेकायदेशीरपणे आरोपपत्र दाखल करणारे पोलीस तपास अधिकारी हे भा.दं.वि. २११ अंतर्गत शिक्षेस पात्र राहतील असे नमूद करत सर्वोच्च न्यायालयाने संबंधीत महिला पोलीस अधिकाऱ्यांविरुद्ध फौजदारी कारवाईचे आदेश Perumal VS. Janki (2014( 5 SCC 377 प्रकरणात दिले होते.

तसेच आरोपीला कसेही करून शिक्षा व्हावी या दुष्ट हेतूने तपासाचे चुकीचे कागद व पुरावे बनविणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यास भा.दं.वि. १९४ अंतर्गत झालेली शिक्षा सर्वोच्च न्यायालयाने योग्य ठरविली होती. (Suresh Sharma Vs. State 2009 Cri.L.J. 4288 (SC),Arvinder Singh (1998) 6 SCC 352)

साक्षीदाराचे खोटे जबाब नोंदवून, खोटी स्टेशन डायरीची नोंद घेवून ती न्यायालयात दाखल करणारा पोलीस अधिकारी हा भा.दं.वि. १९२, १९३ आदी कलमांतर्गत शिक्षेस पात्र राहील असा कायदा आहे. (Babu Vs. State 2007 Cri.L.J. 3802, Arijit Sarkar 2017 SCC OnLine Cal 13 , Modh Zahid Vs. State 1981 Cri.L.J. 2908)

अशीच कारवाई न्यायाधीश, सरकारी वकील, आरोपीचे वकील व पोलीस अधिकाऱ्यांवरही करण्यात आल्याचे कायदे आहेत. (Govind Mehta Vs. State AIR 1971 SC 1708, K. Rama Reddy 1998(3) ALD 305, State Vs. Kamlakar Bhavsar 2002 ALL MR (Cri.) 2640)

## पान ८ वरुन...

### औरंगाबादच्या नामांतरला काँग्रेसचा विरोध, महाविकास आघाडीत ठिणगी?

आधारित गेल्या वर्षभरात महाविकास आघाडी सरकारने चांगले काम केले असल्याचाही दावा त्यांनी केला.

औरंगाबाद शहराचे नाव बदलून संभाजीनगर करण्यात यावे असा प्रस्ताव विभागीय आयुक्तांनी नव्याने पाठविला असल्याचे वृत्त वाहिन्यावरुन अलिकडेच प्रसारीत झाले होते. वास्तविक अशा प्रकारचा प्रस्ताव गेल्या वर्षी म्हणजे ४ जानेवारी रोजी पाठविण्यात आला होता. त्या वेळीही रेल्वे विभागाकडे वारंवार पाठपुरावा करुनही त्यांच्याकडून कोणतेही उत्तर आले नव्हते. मात्र नामांतराचा प्रस्ताव पाठविल्याचे सांगण्यात येत होते. कॉंग्रेस प्रदेशाध्यक्षांच्या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर आलेल्या नामांतराच्या मुद्द्यावर शिवसेनेशी थेट मतभेद असल्याचे गुरुवारी स्पष्ट झाले. गेल्या काही महिन्यापासून औरंगाबादच्या नामांतराचा मुद्दा चर्चेत आणला जात होता. शहरातील चौकात लव्ह औरंगाबाद, सुपर संभाजीनगर असे फलक लावण्यात आले होते. त्यावरुन सुरू असणाऱ्या वादाच्या चर्चेला नामांतराचा प्रस्ताव पाठविल्याची माहिती सांगण्यात आल्याने कॉंग्रेसची भूमिका थोरात यांनी स्पष्ट केले.

**राज्यपालांचे वर्तन लोकशाही बाधा आणणारे**

विधान परिषदेवर नियुक्त करावयाच्या १२ जागांची यादी मंत्रीमंडळाच्या मंजुरीनंतर राज्यपालांकडे पाठविण्यात आली आहे. त्याला बराच कालावधी झाला आहे हे खरेच. खरे तर मंत्रिमंडळाने मंजुरी दिल्यानंतर राज्यपालांकडून तातडीने नियुक्ती होण्याची गरज होती. मात्र तसे झाले नाही हे राज्यपालांचे वर्तन लोकशाहीला बाधा आणणारे आहे अशी टीका बाळासाहेब थोरात यांनी केली.

### सोमनाथ मंदिराखाली मिळाली चक्क तीन मजली इमारत

काही बुद्ध लेण्याही सापडल्या आहेत.

सोमनाथ मंदिर अनेक वेळा मुस्लीम राजांच्या आक्रमणामध्ये नष्ट करण्यात आलं होतं. अनेकवेळा हे मंदिर पाडण्यात आलं आणि बांधण्यात आलं. सातव्या शतकात मैत्रक राजानं बांधलेलं हे मंदिर अरबांनी पाडलं. मग परिहार राजा नागभट्टनं पुन्हा हे मंदिर बांधलं. पुन्हा ते नष्ट झालं. राजा भीमदेव, कुमार पाल यांनी पुन्हा हे मंदिर बांधलं. १७०६ मध्ये औरंगजेबानं हे मंदिर उद्वस्त केलं. त्यानंतर थेट १९५१ मध्ये सरदार वल्लभभाई पटेलांनी सोमनाथाचं मंदिर बांधलं. अनेक आक्रमणांमध्ये नष्ट झालेलं हे मंदिर पुन्हा पुन्हा उभं राहिलं. त्यामुळेच इथल्या खोदकामात तीन मजल्यांची नवी इमारत सापडली. यानिमित्तानं नवा इतिहासही उलगडणार आहे.

# स्नेहल कांबळे वर कायदेशीर कारवाई करून अटक करा वंचित बहूजन आघाडीची मागणी



**साहसिक वृत्त/ ३१ डिसेंबर**

**हिंगणघाट :** स्नेहल कांबळे यांनी वंचित बहूजन आघाडी चे राष्ट्रीय अध्यक्ष मा बाळासाहेब आंबेडकर यानच्या वर सोशल मिडीया मार्फत जे आक्षेपार्ह विधान केले असुन हया व्यक्तीवर गुन्हा दाखल करून त्वरित कारवाई करावी अशी मागणी वर्धा जिल्हा अध्यक्ष अजय घगारे यानच्या आदेशानुसार नेते डॉ उमेश वावरे यानच्या नेतृत्व मा ठानेदार साहेब पोलिस स्टेशन हिंगणघाट यांना निवेदनातून करण्यात आली त्या प्रसंगी मा. जिल्हा उपाध्यक्ष राजेश खानकूरे, दिलिपभाऊ कहूरके,मनिष कांबळे, चारू आटे, जिवन उरकुडे, संतोष सहारे, कुडलीक भजभूजे, मनोहर भगत, केशव सहारे, प्रशांत शंभरकर, वसीम खान, जावेद अली,किशोर माडवकर, सुरेश बुरबुरे व कार्यकर्ते उपस्थित होते .

# पत्नीला खुश करण्यासाठी पुण्यात नवऱ्याने चोरल्या साड्या आणि ड्रेस

***वृत्तसंस्था/ ३१ डिसेंबर***

**पुणे :** पत्नीला मित्राचं साड्यांचं दुकान असल्याचं सांगून त्यानं ३० पेक्षा जास्त साड्या, ड्रेस गिफ्ट केले. एक रोहन सोनटक्के हा सराईत चोरटा वारजे परिसरात चोरीचा मोबाईल विकण्यासाठी येणार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. सापळा रचून त्याला अटक केल्यानंतर ९ चोऱ्यांचा उलगडा झाला. त्याच्याकडून दोन मोटारी, एक दुचाकी, १८ मोबाईल, ३ लॅपटॉप, ३० साड्या, १२ ड्रेस असा १३ लाख ४० हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. नवीन लग्न झाल्यामुळे पत्नीला खुश करण्यासाठी एकाने चक्क साड्या आणि ड्रेस चोरले. रोहन सोनटक्के हा सराईत चोरटा पोलिसांची हाती लागला. त्यानंतर ही माहिती समोर आली. पत्नीला खूश करण्यासाठी कोणी काय करेल हे सांगता येत नाही. असाच एक प्रकार समोर आल्यानंतर अनेकांना आश्चर्याचा धक्का बसला. या चोरट्याची सध्या पुण्यात चांगलीच चर्चा रंगली आहे.

# गांधी पुतळ्याच्या सौंदर्यीकरण करतेवेळी पुतळ्या मागील व्यवसायिकांच्या सुद्धा विचार करा- नगरसेवक सौरभ तिमांडे

## ऑनलाइन व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे पार पडली नगरपरिषदची सभा



**साहसिक वृत्त/ ३१ डिसेंबर**

**हिंगणघाट :** कोरोना महामारीच्या संकटामुळे हिंगणघाट नगर परिषद च्या वतीने सर्वसाधारण सभा ऑनलाइन पद्धतीने व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे गुगल मीट च्या माध्यमातून पार पडली त्यावेळी नगरसेवक सौरभ तिमांडे यांनी शहरातील जनतेच्या हितार्थ विविध मुद्दे नगराध्यक्ष प्रेम बसंतांनी यांच्यासमोर मांडले.

स्थानिक कारंजा चौकात सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने विशेष निधी अंतर्गत सुरु असलेल्या गांधी पुतळ्याचे ६ महिन्यापासून सौंदर्यीकरण व नूतनीकरणाचे काम सुरू आहे परंतु बांधकामाचा नकाशा तयार करताना पुतळ्या मागे असलेल्या व्यावसायिकांच्या व्यवसायाचा विचार न करता अनावश्यक व अवाढव्य कलाकृती तयार करण्यात आली.

पुतळ्याच्या मागील भागात १८ फूट उंचीचे एक ते दीड फूट व्यासाचे सात गोलाकार स्तंभ उभारण्याचे काम सुरू असल्याने दुकानाचा दर्शनी भाग पूर्णपणे झाकल्या जाईल याचा परिणाम येथील व्यावसायिकांवर होणार आहे. पुतळ्याच्या नूतनीकरणास कुठलाही आक्षेप नाही परंतु अनावश्यक बांधकामामुळे व्यवसायिकांना खूप मोठ्या प्रमाणात फटका बसणार आहे.व्यवसायिकांच्या सुद्धा विचार करणे अत्यंत आवश्यक आहे.

नगरसेवक सौरभ तिमांडे व नगरसेविका अर्चना जोशी यांच्या पाठपुराव्याने या कामाला स्तगती देण्यात आली असून लवकरच यावर योग्य तो उपाय काढण्यात येणार आहे जेणेकरून व्यवसायिकांना सुद्धा अडसर निर्माण होणार नाही आणि सौंदर्यकरण्याचे काम सुद्धा होईल तसेच कारंजा चौक मधील हुतात्मा जयस्तंभ चे संवर्धन करण्याकरिता मजबुतीकरण व पाया नव्याने तयार करण्याबाबत मंजुरी देण्यात आली, भंगार साहित्य मध्ये खूप मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार होत आहे म्हणून भंगार लिलावादरम्यान सर्व नगरसेवकांना विश्वासात घेऊन त्यांच्या उपस्थितीमध्ये लिलाव करण्यात यावा, शिवाजी पार्क चे नामकरण छत्रपती शिवाजी महाराज उद्यान करण्यात यावे,श्री संत जगनाडे महाराज मंदिराचा टॅक्स माफ करण्यात यावा, करोना विषाणू महामारी अंतर्गत साफसफाई व जंतुनाशक फवारणी करिता लावण्यात आलेल्या कंत्राटी लेबर यांचे मासिक देयक देण्यात यावे अशा अनेक विषयांवर चर्चा करून नगरसेवकांच्या वतीने अनुमती देण्यात आली व सर्वसाधारण सभेचा कोरम पूर्ण करण्यात आला त्यावेळी नगराध्यक्ष प्रेम बसंतांनी नगरसेवक सौरभ तिमांडे,श्रीधर कोटकर, प्यारू कुरेशी,नरेश इवनाते,वैशाली सुरकार इत्यादी नगरसेवक तसेच नगर परिषदचे अधिकारी ऑनलाइन व्हिडिओ कॉन्फरन्सिंग च्या सर्वसाधारण सभेला उपस्थित होते.

कारंजी चौक येथील गांधी पुतळा च्या सौंदर्यीकरण व नूतनीकरणाचा तिथल्या कोणत्याच व्यवसायिकांना विरोध नाही परंतु बांधकामाचा नकाशा तयार करताना पुतळ्या मागे असलेल्या व्यवसायिकांचा सुद्धा विचार करणे आवश्यक आहे.त्यांचे दुकाने लपल्या नाही गेली पाहिजे अशी मागणी तिथल्या व्यवसायिकांची आहे.हि मागणी मिटिंग मध्ये मांडली आहे व लवकर्यत लवकर या विषयावर तोडगा कहाडण्यात येणार आहे.आम्ही पत्र व्यवहार केले आहे सध्या त्या कामावर स्थगती दिली गेली आहे.

**-सौरभ तिमांडे-**

नगरसेवक प्रभाग १३ व गटनेता न.प.हिंगणघाट,सदस्य जिल्हा नियोजन समिती वर्धा.

# शहराचा सर्वांगिन विकास करायचा असेल तर नगर परिषदेने उत्पन्नाचे स्त्रोत वाढविणे आवश्यक-खासदार रामदास तडस

**साहसिक वृत्त/ ३१ डिसेंबर**

**देवळी**: कोरोनामुळे गेल्या सात महिन्यांपासून नगर परिषदेच्या उत्पन्नात कमालिची घट झाली असून, प्रशासकीय खर्चच जेमतेम भागू लागला आहे. अशा परिस्थितीत नगर उत्पन्न वाढीसाठी मोक्याच्या जागांचा शोध घेवून अशा जागा विकसीत करून त्यापासून कायमस्वरूपी उत्पन्नाचा स्त्रोत सुरू करणे आवश्यक आहे, देवळी नगर परिषदेने याबाबतीत पुढाकार घेऊन अनेक जागेवर कॉम्प्लेक्स बाधून उत्पन्नाचे स्त्रोत वाढविले आहे, शहराचा सर्वांगिन विकास करायचा असेल तर नगर परिषदेने उत्पन्नाचे स्त्रोत वाढविणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन खासदार रामदास तडस यांनी भुमीपूजन प्रसंगी केले.

आज देवळी येथे १४ वा वित्त आयोग (कार्यात्म अनुदान) अंतर्गत आठवडी बाजार चैक ते संत रोहीदास महाराज शॉपींग सेंटर पर्यंत शॉपींग सेंटरचे बांधकामाचे भुमीपूजन वर्धा लोकसभा मतदारसंघाचे खासदार रामदास तडस यांच्या शुभहस्ते संपन्न झाला, कार्यक्रमाला नगराध्यक्षा श्रीमती सुचिता मडावी, उपाध्यक्ष डॉ. नरेन्द्र मदनकर, गटनेत्या सौ. शोभा रामदास तडस, बांधकाम सभापती मारोतराव मरघाडे, मुख्याधिकारी विजय देवळीकर उपस्थित होते.

यावेळी सभापती नंदकिशोर वैद्य, सभापती मिलिंद ठाकरे सभापती संगीता तराळे, सदस्या कल्पना ढोक, सदस्या सारिका लाकडे, सदस्या संध्या कारोटकर, सदस्या सुनीता ताडाम, सदस्या सुनीता बकाणे, स्विकृत सदस्य विजय गोमासे, दिलीप कारोटकर तसेच नगर परिषदेचे अधिकारी व कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.